ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# नंदुरबार जिल्हयातील आदिवासी शेतकऱ्यांचे आर्थिक व सामाजिक जीवनातील सहसंबंध

**डॉ. एस. के. पगार**
के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक.
**राजेश एस. गावित**
पीएच.डी. संशोधक विद्यार्थी
सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, पुणे.

## प्रस्तावना

महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्हा हा प्रामुख्याने आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्हयात एकूण सहा तालुके आहेत. या सहाही तालुक्यात आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे. या आदिवासींचा मुख्य व्यवसाय म्हणजे मागासलेली शेती होय. नंदुरबार जिल्हा प्रामुख्याने गुजरातला लागून असल्यामुळे महाराष्ट्र आणि गुजरात यांच्या सीमेरेषेमधील जंगल मोठया प्रमाणावर असल्यामुळे या जंगल संपत्तीवर काही लोक वेगवेगळे व्यवसाय करताना दिसून येतात. हा समाज आजही मोठया प्रमाणात अंधश्रध्दा, रूढी, परंपरा, अज्ञानी, अडाणी यात जखडलेला आहे.

नंदुरबार जिल्हयात बहुसंख्य आदिवासी लोकांजवळ शेती आहे. परंतु आधुनिक काळात ज्या प्रमाणात बदल होत आहे. वेगवेगळया क्षेत्रांचा विकास होत आहे. त्या प्रमाणात या आदिवासी लोकामध्ये शेती कसण्याच्या पध्दतीमध्ये बदल झालेला नाही. काही मोजक्याच शेतकऱ्यामध्ये शेती कसण्याच्या पध्दतीत बदल झालेला आहे. ज्यांच्याजवळ मोठया प्रमाणात भांडवल आहे. जो शेतकरी शिक्षित आहे, ज्याला आदिवासी योजनांची माहिती आहे, जो राजकारणात सक्रीय आहे त्याच शेतकऱ्याचा विकास झालेला आहे. जो शेतकरी अज्ञान आहे, ज्याला आदिवासी योजनांची माहिती नाही, जो राजकारणात सक्रीय नाही अशा शेतकऱ्यांचे प्रमाण आज नंदुरबार जिल्हयात बहुसंख्य आहे. म्हणून या आदिवासी शेतकऱ्यांचे शेती कसण्याच्या मागासलेपणामुळे त्यांची आर्थिक, सामाजिक परिस्थिती अंत्यत दयनीय आहे. कारण त्यांची शेती मागासलेली असल्यामुळे त्या शेतीमधून त्यांना मिळणारे उत्पन्न कमी आहे. बहुसंख्य आदिवासी शेतकऱ्यांची शेती ही निसर्गावर अवलंबून असल्यामुळे कधी उत्पन्न मिळते तर कधी उत्पन्न मिळत नाही अशी त्यांची शेती असल्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती कमकुवत आहे.

आदिवासी शेतकऱ्यांचे सामाजिक जीवनाकडे एक दृष्टिक्षेप टाकल्यास त्यांचे सामाजिक जीवन आर्थिक, कौटुंबिक जीवनाशी निगडीत आहे ह्या लोकांवर अंधश्रध्देचा पगडा मोठया प्रमाणावर दिसून येतो. या लोकांचे संपूर्ण सामाजिक जीवन हे त्यांच्या चालीरितीनुसारच असते. त्या चालीरिती परंपरांच्या विरूध्द वर्तन करायला त्यांना आवडत नाही. उदा. पुजा, विधी, सण इत्यादीच्या वेळी मद्यप्राशन (दारू) करणे तसेच पुरूष, महिला व बालके या सर्वांनी ते मद्यप्राशन करणे, त्याचबरोबर होळी, दिवाळी, वाघदेव, इंदलदेव, भोंगऱ्यादेव, पोळा, कानुबाई, शेटपुजा, चक्रपुजा, भालदेव, वटपौर्णिमा, अक्षयतृतीया इत्यादी सण ग्रामीण भागात मोठया उत्साहाने साजरे करतात.

नंदुरबार जिल्हयात आदिवासी शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती बघितल्यास त्याचे जीवन अत्यंत दयनीय आहे. भारताला स्वांतत्र्य मिळून 68 वर्षे पूर्ण झालीत. अनुसूचित जाती – जमातीसाठी मोठया प्रमाणावर शासनाने कल्याणकारी योजना राबविल्या व सध्याही राबविल्या जात आहेत. तरी या समाजाचा आर्थिक व सामाजिक विकास का होत नाही या दृष्टीने संशोधकाने प्रत्यक्ष या समाजातील जीवन स्वतः बघितल्यामुळे संशोधकाने आदिवासी समाजातील शेतकऱ्यांची आर्थिक अहवालाद्वारे आदिवासी शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक वास्तव स्थिती काय आहे? व या आदिवासीच्या विकासासाठी कोणत्या उपाययोजना करता येईल याचे विस्तृत विश्लेशन या प्रबंधाद्वारे करण्याचा प्रयत्न केला आहे.

## संशोधन विषय

*''नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांचे आर्थिक आणि सामाजिक अध्ययन (सन 1998 ते 2011)''*

1 एप्रिल 1998 रोजी धुळे जिल्हयाला विभागून नवीन नंदुरबार जिल्हयांची स्थापना करण्यात आली. 1991 च्या जनगणनेनुसार धुळे जिल्हयांची आदिवासी लोकसंख्या महाराष्ट्रात सर्वात जास्त होती. 1991 च्या जनगणेनुसार अनुसूचित जमातीची लोकसंख्या 62.25ः होती. याच कालखंडात नंदुरबार जिल्हयांची एकूण गावाची संख्या 934 एवढी होती. (1991 च्या जनगणनेनुसार) आणि एकूण आदिवासी क्षेत्र शेकडा प्रमाण 87ः एवढे आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

नंदुरबार जिल्हा महाराष्ट्रातील मागासलेल्या जिल्हयापैकी एक जिल्हा आहे. या जिल्हयात आदिवासी शेतकऱ्यांचे एकंदरीत शेती कसण्याची पध्दती मागासलेली आहे. जिल्हयात आजही मोठया प्रमाणात अंधश्रध्देमुळे या शेतकऱ्यांचे जीवन, आर्थिक, सामाजिक दृष्टीकोनातून मागासलेले आहे. जिल्हयांतील या आदिवासी शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी किंवा विकासासाठी चिकित्सक अभ्यास करणे गरजेचे वाटले व संषोधकाला हा केलेला अभ्यास आदिवासी विकास कार्यात मार्गदर्शक ठरेल असा विष्वास वाटतो.

## विषय निवडीमागची पार्श्वभुमी

अर्थशास्त्र विषयातील पीएच. डी. या पदवीसाठी सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठास ''नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांचे आर्थिक आणि सामाजिक अध्ययन सन 1998 ते 2011'' या शिर्षकाचा प्रबंध अभ्यासावयास घेतला आहे. हा विषय निवडीमागील पार्श्वभूमी स्पष्ट करणे आवश्यक आहे. संशोधक हा स्वतः आदिवासी समाजातील असल्यामुळे हालाखीतून शिक्षण घेऊन महाविद्यालयात नोकरी करण्याची संधी मिळाली व नोकरी करीत असताना संशोधनही केले पाहिजे या शासनाच्या धोरणामुळे संशोधकाने आपल्याच समाजातील शेतकरी बांधवांची मागासलेली शेती व मागासलेल्या शेतीमुळे त्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती कषी मागासलेली आहे याचे प्रत्यक्ष जीवन जगताना पाहिले असल्यामुळे प्रस्तुत विषय अभ्यासावयास घेतला आहे तसेच या समाजामध्ये असणारी व्यासनाधिनता, अंधश्रध्दा, रूढी, परंपरा, दारिद्रय, बेरोजगारी, कर्जबारीपणा इत्यादी विविध समस्यांना मोठया प्रमाणात तोंड द्यावे लागत असल्यामुळेही प्रस्तुत विषय निवडला आहे.

संशोधक महाविद्यालयीन जीवन जगताना नवापूर तालुक्यातील (नंदुरबार जिल्ह्यातील) कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क आल्याने त्यांनी करंजी खुर्द या गावात शेतकऱ्यांचा मार्गदर्षक म्हणून नेमणुक केली होती तेव्हापासून सदर विषयात गोडी निर्माण होऊन हा विषय अभ्यासावयास घेतला आहे. स्वातंत्र्याच्या 68 वर्षानंतरही या आदिवासींना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याने या समस्या सरकार सेवाभावी संस्था, सामाजिक कार्यकर्ते यांच्यापर्यंत पोहचविता याव्यात यादृष्टीने सदर विषय संशोधकाने अभ्यासावयास घेतला आहे.

## संशोधनाचे महत्त्व

1) जिल्हयातील एकूण आदिवासी क्षेत्राचे सरासरी प्रमाण 87ः आहे. या जिल्हयातील बहुसंख्य लोकसंख्या शेती कसते व ही शेती आजही मोठया प्रमाणात परंपरागत पध्दतीने कसत असल्यामुळे आजच्या विज्ञान युगात आदिवासी शेतकरी मागे राहू नये यासाठी आधुनिक पध्दतीने शेती केल्यास त्यांच्या उत्पादन क्षमतेत वाढ होण्यास मदत होईल त्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वाचे आहे.

2) आदिवासी शेतकऱ्यांची शेती मागासलेली असल्यामुळे त्याचे उत्पन्न कमी असल्याने त्यांची बचत क्षमता देखील कमी असते. परिणामी त्यांची शेतीतील गुंतवणूक कमी होते. आदिवासी शेतकऱ्यांची उत्पन्न व बचत क्षमता वाढवायची असेल तर आदिवासी विकास योजनांचा लाभ घेणे आवष्यक आहे. त्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वाचे आहे.

3) आदिवासी शेतकऱ्यांमध्ये दारिद्रयांचे प्रमाण जास्त आहे. तसेच शिक्षणाचा अभाव असल्यामुळे अंधश्रध्देचे प्रमाण जास्त आहे. या संशोधनाच्या माध्यमातून आदिवासी शेतकऱ्यांमध्ये असणारी अंधश्रध्दा, व्यासनाधिनतेचे मोठे प्रमाण, अनिष्ठ रूढी, परंपरा, प्रथा कमी होण्यास व शिक्षणाचा प्रसार वाढल्यास त्यांच्यात जागृती होवून त्यांच्या राहणीमानात सुधारणा होईल या दृष्टीने हे संशोधन महत्त्वाचे आहे.

4) जिल्हयांतील आदिवासी समाज अज्ञानी, अडाणी, देवभोळा असून रूढी, परंपरा, चालिरिती इ. बंधनात जखडलेला आहे. त्यांचा अभ्यास करून व या समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे.

5) आदिवासी समाजाकडे इतर समाजाचा बघण्याचा जो नकारात्मक दृष्टिकान आहे तो बदलण्यास काही प्रमाणात हे संशोधन महत्त्वाचे आहे.

6) जिल्हयातील साधारणतः हा निम्मे शेतकरी निरक्षर आहेत. त्यामुळे त्यांच्या निरक्षरतेचा प्रभाव शेतीवर पडतो. त्यामुळे शिक्षणाला महत्त्व आहे. म्हणून शिक्षणाचा प्रसार, प्रचार होणे गरजेचे आहे हे या संशोधनावरून लक्षात येते.

7) आदिवासी शेतकऱ्यासाठी शासनाने अनेक योजना राबविल्या आहेत. त्यातील बोटावर मोजण्याइतक्याच शेतकऱ्यांना या योजनाचा लाभ होतो. म्हणून जे शेतकरी अत्यंत गरीब आहे. मागासलेले आहे त्यांना राबवित असलेल्या योजनाचा लाभ होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यादृष्टिनेही हे संशोधन महत्त्वाचे आहे.

## संशोधन विषयाची उद्दिष्टे

1) आदिवासी शेतकऱ्यांच्या शेती कसण्याच्या पध्दती व पीक रचनेचा अभ्यास करणे.

2) आदिवासी शेतकऱ्यांच्या विविध आर्थिक स्त्रोतांचा अभ्यास करणे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

3) शासनाने आदिवासी शेतकऱ्यांसाठी राबविलेल्या विविध योजनाचा अभ्यास करणे.

4) आदिवासी शेतकऱ्यांच्या राहणीमानाचा अभ्यास करणे.

5) आदिवासी शेतकऱ्यांच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास करणे.

## गृहित कल्पना

प्रस्तुत संशोधनात पुढील गृहित कल्पना तपासून पाहिल्या आहेत.

1) आदिवासी शेतकऱ्यांची शेती कसण्याची पध्दती आणि उत्पन्न यात सहसंबंध आहे.

2) आदिवासी शेतकरी कुटुंबाची आर्थिक स्थिती कुमकुवत आहे.

3) आदिवासी शेतकऱ्यांचे उत्पन्नाचे मार्ग (स्त्रोत) व राहणीमान यात सहसंबंध आहे.

4) आदिवासी शेतकऱ्यांचा सामाजिक दर्जा व आर्थिक परिस्थिती यात सहसंबंध आहे.

## माहिती संकलन करण्याची पध्दती

प्रस्तुत संशोधन प्राथमिक व दुय्यम सामग्रीवर आधारीत आहे. संशोधकाने निवडलेल्या विषयाची व्याप्ती नंदुरबार जिल्ह्यापुरतीच मर्यादित असून जिल्ह्यातील 934 गावांपैकी 10 प्रमाणे 94 गावे अध्ययनासाठी वापर केलेला आहे. या 94 गावातील मोठे 94, अल्प 188 व मध्यम 282 असे एकूण 564 शेतकरी कुटुंबाकडून प्रष्नावली भरून घेतलेल्या आहेत.

## संशोधनाची मर्यादा

1) प्रस्तुत अभ्यास नंदुरबार जिल्हयापुरता व निवडलेल्या गावापुरताच मर्यादित आहे.

2) अभ्यासकाने गोळा केलेली माहिती प्रत्यक्ष व दुय्यम संकलन पध्दतीवर आधारलेली असल्यामुळे ती 100ः खरी असेलच असे नाही.

3) अभ्यासकाने संपूर्ण जिल्हयातील माहिती संकलनासाठी प्रश्नावली व संदर्भ साहित्याचा अभ्यास करून सदर विषयाचे विश्लेषण केले आहे.

4) आदिवासी शेतकऱ्यांच्या विकासासाठी असलेली शासकीय योजनाची माहिती पूर्ण मिळेलच असे नाही.

5) संशोधकाने अभ्यासाचा कालावधी 1998 ते 2011 या कालावधीपुरता मर्यादित आहे.

6) आदिवासी शेतकऱ्यांचा हा अभ्यास दुसऱ्या आदिवासी जिल्हयास तसाच लागू पडेल असे नाही.

तरी देखील संशोधक शक्यतो पूर्वग्रह दोषरहित तथ्य संकलन करून विश्लेषण केलेले आहे.

## आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक जीवनातील सहसंबंध

1) नंदुरबार जिल्ह्याचा महाराष्ट्रातील सामाजिक गरजा बघितल्यास 35 वा क्रमांक आहे. महाराष्ट्र साक्षरतेच्या दृष्टिकोनातून 82.91 टक्के लोकसंख्या साक्षर (2011 च्या जनगणनेनुसार) आहे. तर नंदुरबार जिल्ह्यांत ते सर्वात 63.04 टक्के आहे. तर महाराष्ट्रातील 10 वी तील गळतीची प्रमाण 53 टक्के आहे. तर हे प्रमाण या जिल्ह्याात 56 टक्के आहे. महाराष्ट्र दारिद्रयरेषेखालील टक्केवारीत 34.55 टक्के आहे. तर हे प्रमाण या जिल्ह्याात 75.43 टक्के आहे. मनुष्य विकास निर्देशांकात महाराष्ट्र 0.58 टक्के प्रमाण आहे. तर नंदुरबार जिल्ह्याात हे प्रमाण 0.20 टक्के आहे व त्यात नंदुरबार जिल्ह्याचा सामाजिक दर्जा सर्वात खालचा म्हणजे 35 वा आहे.

2) नंदुरबार जिल्ह्याचा ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची टक्केवारी 72 टक्के आहे. (संदर्भ वर्ष 2002 ते 2007) त्यात नवापूर – 70 टक्के, नंदुरबार – 68 टक्के, शहादा – 64 टक्के, तळोदा – 76 टक्के, अक्कलकुवा – 83 टक्के व धडगावात – 84 टक्के असे हे प्रमाण आहे.

संशोधकाने संकलित केलेल्या माहितीवरून 564 शेतकरी कुटुंबापैकी 304 शेतकरी कुटुंबे दारिद्रय रेषेखाली दिसून आली व त्यांचे शेकडा प्रमाण 53.90 टक्के एवढे आहे. (संशोधकाने फक्त शेतकरी कुटुंबाचे सर्वेक्षण केलेले आहे.)

3) संशोधकाने नमुना निवडीतील 564 शेतकरी कुटुंबाचे सर्वेक्षण केले आहे त्यातील आदिवासी हिंदु असणाऱ्या शेतकरी कुटुंबाचे प्रमाण 492 असून त्याचे शेकडा प्रमाण 87.20 टक्के आहे. ख्रिस्ती धर्मांतरण करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण 12.80 टक्के आहे. हिंदु आदिवासी समाजात प्रचंड प्रमाणात व्यासनाधिनतेचे प्रमाण मोठया प्रमाणावर आहे. विशेष म्हणजे मोहाची दारू, तंबाखू, बिडी, तपकीर, गुटखा असे बरेच प्रकार या समाजात परंपरेने चालत आलेले आहेत. त्याचा परिणाम त्यांच्या राहणीमानावर व आर्थिक परिस्थितीत होऊन ते निकृष्ट दर्जाचे जीवन जगत आहे हे दिसून आले.

4) जिल्ह्यातील नमुना निवडीतील 564 शेतकरी कुटुंबापैकी जिरायती किंवा कोरडवाहू शेती असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण 427 असून त्याचे शेकडा प्रमाण 75.70 टक्के आहे तर बागायती शेती असणाऱ्या शेतकरी कुटुंबाचे

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
प्रमाण 135 आहे त्याचे शेकडा प्रमाण 23.93 टक्के आहे. यावरूनही स्पष्ट होते की, जिरायती शेती असेल तर मिळणारे उत्पन्नही कमी असते व त्याचा परिणाम त्यांच्या राहणीमानावर होतो हे सिध्द होते.

5) नमुना निवडीतील आदिवासी शेतकऱ्यांच्या निवाऱ्यावरून 564 कुटुंबापैकी 17.73 टक्के सिमेंट विटांचे (पक्की घरे) आहेत. तर दगड मातीची घरे असणाऱ्यांचे शेकडा प्रमाण 18.91 टक्के एवढे आहे. तर बेघर योजनेतील (इंदिरा आवास योजना) घरे असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण 14 टक्के आहे तर लाकुड व बांबुंच्या काबंड्यापासून कुडांची घरे असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण 49.29 टक्के एवढे आहे. म्हणजेच पक्की घरे वगळल्यास साधी निवारा असणाऱ्या घरांचे प्रमाण 82.26 टक्के एवढे आहे. त्याचाही परिणाम राहणीमानावर होतो.

6) संशोधकाने नमुना कुटुंबांकडे असणाऱ्या भौतिक सुविधा (साधने) चाही अभ्यास केला आहे. नमुना निवडीतील 564 शेतकरी कुटुंबापैकी गॅस कनेक्शन असणाऱ्या कुटुंबाची संख्या 137 असून त्याचे शेकडा प्रमाण 24.29 टक्के आहे. फ्रिज असणाऱ्या कुटुंबाची संख्या 139 इतकी असून त्याचे शेकडा प्रमाण 24.64 टक्के आहे. मिक्सर असणाऱ्या कुटुंबाची संख्या 178 असून त्याचे शेकडा प्रमाण 68.43 टक्के आहे. दुरदर्शन संच (टी.व्ही.) असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण 265 असून त्याचे शेकडा प्रमाण 46.98 टक्के आहे. टेलिफोन किंवा मोबाईल असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण 330 असून त्याचे शेकडा प्रमाण 58.51 टक्के एवढे आहे. सायकल असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण 183 असून त्याचे शेकडा प्रमाण 32.45 टक्के आहे. मोटार सायकल असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण 121 असून त्याचे शेकडा प्रमाण 21.50 टक्के आहे. चारचाकी गाडी असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण 58 असून त्याचे शेकडा प्रमाण 10.28 टक्के एवढे आहे. बैलगाडी असणाऱ्या शेतकरी कुटुंबाची संख्या 243 असून त्याचे शेकडा प्रमाण 43.08 टक्के आहे. ट्रॅक्टर असणाऱ्या शेतकरी कुटुंबाची संख्या 52 असून त्याचे शेकडा प्रमाण 9.20 टक्के एवढे आहे. मळणी यंत्र असणाऱ्या शेतकरी कुटुंबाची संख्या 37 असून त्याचे शेकडा प्रमाण 6.56 टक्के आहे.

## समारोप

एकंदरीत वरील सर्व माहिती लक्षात घेतल्यास नंदुरबार जिल्ह्यात आजही मोठया प्रमाणात निरक्षरता, अधंश्रध्दा, रूढी, परंपरा, बेरोजगारी, कोरडवाहू शेती या सर्वांचा परिणाम त्यांच्या आर्थिक व सामाजिक जीवनावर होतो म्हणून या समाजाला विकासाच्या मार्गावर आणण्यासाठी शासन राबवित असलेल्या योजना त्यांच्यापर्यंत पोहचविल्यास नक्कीच या समाजाचा विकास होईल. त्याचबरोबर जनजागृती, साक्षरता प्रसार होणेही अत्यंत गरजेचे आहे.

## संदर्भ

1. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन. (2011–12)
2. वार्षिक आदिवासी उपयोजना अहवाल (2000 ते 2010) महाराष्ट्र शासन, अदिवासी विकास योजना
3. हाकारा त्रैमासिक जुलै – डिसें. 2005, जाने. – जुलै 2007.
4. डॉ.गोविंद गारे 'महाराष्ट्रातील अदिवासी जमात' – अनिरुध्द अनंत कुलकर्णी, कॉन्टिनेंटल प्रकाषन, विजनगर पुणे. 2002
5. www.nandurbar.nic.in
6. www.mahatribal.com